# प्रेसनोट

सामाजिक परिस्थितीनुसार गुन्हयाचे स्वरुप बदलत आहे. सामाजिक परिवर्तन लक्षात घेता समाजामध्ये गुन्हे हे कालानुरुप घडतच जाणार आहे. तंत्रज्ञान गुन्हेगार व्यक्तिलाही सहज उपलब्ध होते व त्यांचा दुरुपयोग ते करत आहेत. पंधरा ते वीस वर्ष कालावधीपुर्वीचे गुन्ह्यातील फरार आरोपी सद्यस्थितीमध्ये तो गुन्हेगार कसा दिसत असेल त्याचे विविधरुपांची रेखाचित्रे काढणे व गुन्हा करुन पसार झालेला गुन्हेगार व बेवारस मयताची ओळख पटविणे आणि करोडो लोकांमधुन त्याला शोधुन काढणे तसेच सीसीटिव्ही फुटेज मधील अस्पष्ट दिसणारी व्यक्ति व्हिडीओ एडीटिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्याची स्पष्टता विकसीत करणे व त्यावरुन त्या व्यक्तिचे रेखाचित्र रेखाटन व गरज वाटल्यास त्याचे शिल्प तयार करणे, पोलीस यंत्रणेला गुन्हे आणि तपासकामी वर्णनावरुन गुन्हेगाराचे रेखाचित्र काढुन घेणे हे अनिवार्य ठरणार आहे. त्या कार्यात रेखाचित्रकाराची मदतही अनिवार्य आहे.

श्री सुबोध कुमार जायसवाल तत्कालीन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे निर्देशानुसार राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, मुख्यालय, पुणे याठिकाणी श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी रेखाचित्र कक्षाची स्थापना केली असून, त्याचे उद्घाटन दि. ०६/०७/२०२० रोजी तत्कालीन श्री सुबोध जायसवाल पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले आहे. त्या दरम्यान महाराष्ट्रातील प्रत्येक पोलीस जिल्हयातील गुन्हे अन्वेषण विभागांतर्गत ५ पोलीस अधिकारी/ अमंलदार यांना प्रशिक्षित करणेबाबत तत्कालीन पोलीस महासंचालक यांनी मानस व्यक्त केला होता. त्या नुसार पोलीस घटकांना कळविण्यात आले होते. त्यानुसार ८३ पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी प्रशिक्षण कामी इच्छा दर्शविलेली आहे.

या रेखाचित्र विभागाचे महत्व मा. अपर पोलीस महासंचालक श्री.अतुलचंद्र कुलकर्णी व मा.प्रा.डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी जाणलेनेच महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण देऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र देणेबाबत दि.२/११/२०२० रोजी गुन्हे अन्वेषण विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीट यांचेत समन्वय करार होऊन मुहूर्तमेढ रोवली गेली आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील पुणे ग्रामीणचे २, पुणे शहरचे ५ व गु.अ.वि. कडील १० व पोलीस संशोधन केंद्र , पुणे कडील १ अधिकारी असे महाराष्ट्र पोलीस दलातील १८ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे ५५ दिवस म्हणजेच २७५ तासांचे प्रशिक्षण कोरोनाचे कालावधीत बंदोबस्त व इतर नियमित कामकाज पाहून दि.१/०२/२०२१ ते दि.२२/०४/२०२१ या



Scanned with CamScanner

दरम्यान पूर्ण केलेले आहे. दिनांक २१/०५/२०२१ रोजी त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून कोरोनाची पार्श्वभूमी पाहता सर्व नियमांचे पालन करून मा.अपर पोलीस महासंचालक श्री.अतुलचंद्र कुलकर्णी व कुलगुरू मा.प्रा.डॉ. नितीन करमळकर, यांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.

गुन्हाकरून फरार झालेल्या संशयीत आरोपीचे तसेच सीसीटीव्ही फुटेजमधील अस्पष्ट दिसणारे संशयीत व्यक्तीचे, भविष्यामध्ये प्रशिक्षित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकडून रेखाचित्र रेखाटन करून गुन्हे उघडकीस येण्यास निश्चित मदत होणार आहे. व गुन्हयाचे दोषसिध्दीचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे.

सदर प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देण्यासाठी डॉ. गिरीष चरवड, प्राध्यापक, भारती विद्यापीठ, पुणे यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण कालावधीत प्रत्येक प्रशिक्षण सत्राचे शेवटी प्रशिक्षणार्थी यांची चाचणी घेण्यात आलेली आहे. प्रशिक्षणार्थी यांनी काढलेल्या रेखाचित्रांचे तज्ञ परिक्षक श्री. समीर धर्माधिकारी, चित्रकार, ॲडव्हर्टासिंग हेड, सारांश ॲड, पुणे व नुपूर मोहनकर, ग्राफिक डिझायनर, पुणे यांनी परिक्षण करून त्यांचे मूल्यमापन केले आहे. तज्ञ परिक्षक यांनी प्रशिक्षणार्थी यांनी अत्यंत कमी कालावधीत उत्कृष्ट प्रगती केल्याचेही निरीक्षण नोंदविले आहे.

तसेच या पुढील कालावधीतही महाराष्ट्रातील पोलीस घटकांकडील इच्छुक पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. त्यांना गुन्हे अन्वेषण विभागाचे मुख्यालयात प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदरचा प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पार पडला. सदर कार्यक्रमात मा.प्रा.डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मा. श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, श्री. मकरंद रानडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, श्री. रंजन कुमार शर्मा, पोलीस उप महानिरीक्षक, श्री. संभाजी कदम, पोलीस अधीक्षक, गु.अ.वि., व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रोफेसर अविनाश कुंभार, एच.ओ.डी. रसायन शास्त्र विभाग, प्रोफेसर सुरेश गोसावी भौतिक शास्त्र विभाग हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे वेळी अविनाश कुंभार यांनी उपस्थितांचे स्वागत केले व श्रीमती अनुजा देशमाने यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित केले तसेच संभाजी कदम गुअवि यांनी सर्वांचे अभार मानले .

( संभाजी कदम )
पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा,
रा.गु.अ.वि., म.राज्य, पुणे.

D/Letter West 2021

Scanned with CamScanner